आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

५ जानेवारी २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल असा प्रधानमंत्र्यांना  विश्वास /दिल्लीतल्या १२ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचा केला प्रारंभ

- महाराष्ट्रातली सहकार क्षेत्राची परंपरा मोठी असून देशाला दिशा देण्याची क्षमता या परंपरेत असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन

- तटरक्षक दलाच्या हेलिकॉप्टरला पोरबंदर विमानतळाच्या धावपट्टीवर झालेल्या अपघातात ३ जणांचा मृत्यू

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या अंतिम सामन्यात भारतावर ६ गडी राखून मात करत ऑस्ट्रेलियाचा ३-१ असा मालिकाविजय / भारताचा जसप्रीत बुमराह ठरला मालिकावीर

**<><><><><>**

भारत लवकरच जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजधानी दिल्लीत रेल्वे, मेट्रो आणि आरोग्याशी संबंधित १२ हजार २०० कोटी रुपयांच्या योजनांचं उद्घाटन आणि लोकार्पण झालं, त्यानिमित्तानं रोहिणी इथं झालेल्या कार्यक्रमला ते संबोधित करत होते. येत्या २५ वर्षांत भारत विकसित देश झालेला आपण पाहू असं ते म्हणाले.

**होल्ड बाईट... प्रधानमंत्री**

दिल्लीला या विकसित देशाची राजधानी म्हणून अधिक विकसित करण्याचा मनोदय प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

भारतातलं मेट्रो रेल्वे सेवेचं जाळं आता एक हजार किलोमीटरपर्यंत विस्तारलं असून, भारत सर्वात मोठे मेट्रो रेल्वे सेवा जाळे असलेला, जगातला तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे. येत्या काळात याबाबतीत आपण दुसरं स्थान मिळवू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेल्या दशकभरात केंद्र सरकारनं पायाभूत सोयी सुविधांच्या विकासावर, तसंच शहरांमध्ये आणि एका शहराला इतर शहरांशी जोडण्यावर भर दिला आहे. त्यादृष्टीनं पायाभूत सुविधांसाठी नियोजित आर्थिक तरतूद ११ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त केली असल्याचं त्यांनी सांगितलं. .

या कार्यक्रमापूर्वी प्रधानमंत्र्यांनी गाजियाबाद जिल्ह्यातल्या साहिबाबाद रेल्वे स्थानक ते दिल्लीतील न्यू अशोकनगर रेल्वेस्थानकादरम्यान नमो भारत रेल्वेनं प्रवासही केला. प्रवासादरम्यान त्यांनी शालेय विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी विविध योजना आणि प्रकल्पांचं उद्घाटन,लोकार्पण आणि पायाभरणी केली.

साहिबाबाद ते न्यू अशोक नगर दरम्यान दिल्ली-गाझियाबाद - मेरठ नमो भारत कॉरिडॉरच्या १३ किलोमीटर लांबीच्या विस्तारीत मार्गाचं उद्घाटन करून त्यांनी दिल्लीला पहिल्या नमो भारत रेल्वे गाडीची भेट दिली. दिल्ली मेट्रोच्या चौथ्या टप्प्याच्या विठाला कुंडली क्षेत्राची पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली. दिल्लीतील रोहिणी इथल्या केंद्रीय आयुर्वेद संशोधन

संस्थेच्या नवीन अत्याधुनिक इमारतीच्या कामाचं भूमिपूजनही त्यांच्या हस्ते झालं.

<><><><><>

महाराष्ट्रातली सहकार क्षेत्राची परंपरा मोठी असून देशाला दिशा देण्याची क्षमता या परंपरेत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते आज नागपुरात मानेवाडा इथं गांधीबाग सहकारी बँकेच्या इमारतीचं उद्घाटन करताना बोलत होते. सहकार क्षेत्रातल्या संस्थांसाठी विश्वासार्हता आणि गुणवत्ता हेच सर्वांत मोठं भांडवल आहे, असं ते म्हणाले.

विदर्भात सहकार क्षेत्रात कर्मचारी आणि संचालकांना उत्तम प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. निर्णयक्षमता, सांघिक कार्य, यांचं प्रशिक्षण दिलं, तर त्याचा नक्कीच फायदा होईल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

<><><><><>

नागरिकाची राष्ट्रवादाशी घट्ट बांधिलकी असल्याशिवाय कोणत्याही देशाचा विकास होऊ शकत नाही, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे ते आज दिल्लीत राष्ट्रीय छात्र सेनेच्या यंदाच्या प्रजासत्ताक दिन शिबिराला भेट दिल्यानंतर बोलत होते.

भारताच्या विकासाकरता नागरिकांचा राष्ट्रवाद आणि संघटन तसंच राष्ट्र प्रथम हा दृष्टिकोन आवश्यक आहे. देशाचा कायापालट हा सामाजिक ऐक्य, तळागाळात रुजलेली देशभक्तीची मूल्य, पर्यावरणविषयक जागृती,

स्वावलंबन आणि नागरी कर्तव्य या पाच स्तंभांवर आधारित आहे. या पाच स्तंभांची आठवण ठेवत भारतीय नागरिकांनी तसंच युवकांनी भारताला एक स्वाभिमानी देश म्हणून नावारूपाला आणावं, असं आवाहन धनखड यांनी यावेळी केलं.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या उपस्थितीत आज उत्तर मुंबईत भाजपच्या विशेष सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात झाली. गोयल स्वतः बोरिवली रेल्वेस्थानकाजवळ आयोजित सदस्य नोंदणी अभियानात सहभागी झाले होते. अधिकाधिक नागरिकांनी भाजपाचं सदस्यत्व स्वीकारावं, असं आवाहन गोयल यांनी यावेळी केलं.

<><><><><>

भारतीय तटरक्षक दलाच्या हेलिकॉप्टरला आज गुजरात मधल्या पोरबंदर विमानतळाच्या धावपट्टीवर झालेल्या अपघातात दोन वैमानिक आणि एका विमान कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. हे हेलिकॉप्टर नियमित सराव करत असताना हा अपघात झाला. अपघाताचं नेमकं कारण शोधण्यासाठी पुढील तपास सुरु झाल्याचं तटरक्षक दलानं सांगितलं.

<><><><><>

बॉर्डर-गावस्कर कसोटी क्रिकेट मालिका ऑस्ट्रेलियानं ३-१ अशी जिंकली आहे. सिडनी इथं झालेल्या पाचव्या सामन्यात आजच्या तिसऱ्या दिवशी भारतीय संघानं दिलेलं १६२ धावांचं लक्ष्य ऑस्ट्रेलिया संघानं ४ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केलं.

आज तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात झाल्यानंतर भारतीय संघ केवळ १५७ धावांवर गारद झाला. भारतीय गोलंदाज जसप्रित बुमराहला मालिकावीर तर ऑस्ट्रेलियाचा गोलंदाज स्कॉट बोलंड याला सामनावीर किताबानं गौरवण्यात आलं.

ऑस्ट्रेलियानं बॉर्डर-गावस्कर कसोटी मालिका तब्बल दहा वर्षांनी जिंकली आहे. तसच या मालिका विजयामुळं ऑस्ट्रेलिया संघानं कसोटी विश्व करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यांचा सामना आता दक्षिण अफ्रिकेशी होणार आहे.

**<><><><><>**

आदिवासी विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचं बक्षीस वितरण आज नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झालं. यावेळी विविध स्पर्धांमधे चमकदार कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांचं मुख्यमंत्र्यांनी कौतुक केलं. ते म्हणाले.....

**होल्ड - बाईट - देवेंद्र फडनवीस**

महारेलने राज्यात बांधलेल्या सात उड्डाणपुलांचं लोकार्पणही आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नागपुरात झालं. यात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, वाशीम, अमरावती, जळगाव आणि धुळे जिल्ह्यातल्या प्रत्येकी एका उड्डाणपुलाचा समावेश आहे.

नागपुरातल्या भांगडिया फाऊंडेशनच्या एनएसएच क्रिटिकल केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँड डायग्नॉसिस सेंटरचं उद्घाटनही आज मुख्यमंत्र्यांनी केलं.

<><><><><>

श्रीलंकेत होणार असलेल्या दिव्यांग क्रिकेट करंडक स्पर्धेकरता भारतीय निवड समितीनं आज १७ दिव्यांग खेळाडूंची निवड केली असून संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी विक्रांत रवींद्र केणीवर सोपवली आहे. या स्पर्धेचा पहिला सामना १२ जानेवारीला भारत आणि पाकिस्तान या दोन संघात रंगणार असून अखेरचा सामना २१ जानेवारीला होणार आहे. दूरदर्शनवर या स्पर्धांचं थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

<><><><><>

भारतीय टेनिसपटू सुमित नागलनं न्यूझीलंडमध्ये सुरू असलेल्या एएसबी क्लासिक टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या मुख्य फेरीत प्रवेश केला आहे. त्याने आज सकाळी पात्रता फेरीच्या अंतिम सामन्यात फ्रान्सच्या एड्रियन मॅनारिनोचा पराभव केला. या स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत उद्या, भारताचा युकी भांब्री आणि त्याचा फ्रेंच साथीदार अल्बानो ऑलिवेट्टी या जोडीचा सामना नेदरलँडचा सँडर एरेंड्स आणि ब्रिटनचा ल्यूक जॉन्सन या जोडीशी होणार आहे.

<><><><><>

सीएसआयआर अर्थात वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेनं पॅरासिटामोल या वेदनाशामक आणि तापावरच्या गुणकारी औषधाची निर्मिती करण्यासाठी एक स्वदेशी तंत्रज्ञान विकसित केलं आहे, अशी घोषणा केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री डॉ जितेंद्र सिंग यांनी केली आहे. ते आज सीएसआयआर च्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत

होते. या संशोधनामुळे भारताला पॅरासिटामोलच्या निर्मितीमध्ये स्वयंपूर्ण होता येईल तसंच या औषधाच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या घटकांसाठीचं आयातीवरचं अवलंबित्व कमी होईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय पोलाद मंत्री एच. डी. कुमारस्वामी उद्या नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं पोलाद उद्योगासाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना वन पॉईंट वन चा प्रारंभ करतील. या योजनेमुळे २७ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे, तसंच १४ हजारांपेक्षा जास्त रोजगारही निर्माण झाले आहेत असं पोलाद मंत्रालयानं म्हटलं आहे.

**//<><><><><>//**